

# खजिना साहसकथांचा

अशोक लोटणकर

परी प्रकाशन

**खजिना साहसकथांचा**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.


**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | झाडाचा संदेश | ३ |
| २. | राक्षस मित्र | ८ |
| ३. | फ्वॉक्सपूरची मँगो मॅडम | १३ |
| ४. | अलखपूरची जत्रा | १८ |
| ५. | अक्षय-ज्योती | २२ |
| ६. | राजू आणि झिंपी | ३० |
| ७. | जम्बोचा नवस | ३५ |
| ८. | चंदू चंचल चंपीकर | ४१ |
| ९. | डकसेनचा डाव | ५३ |
| १०. | जय हो... | ५९ |
| ११. | परीच्या राज्यात | ७८ |
| १२. | डॅच्यू फुलाय | ९७ |
| १३. | शूर सैनिक | १०६ |
| १४. | सर्कशीचा पास | ११४ |
| १५. | दामू भटजी | १३० |
| १६. | रेस्क्यू ऑपरेशन | १३८ |
| १७. | बॉम्बस्फोट – प्रसंगावधान | १४५ |
| १८. | चिंगी | १४९ |
| १९. | मॅनचो झाला हिरो | १६८ |
| २०. | मिलिटरी बॉय | १७८ |





# झाडाचा संदेश

रखरखत्या उन्हात भलं मोठं वडाचं झाड आपल्या फांद्या पसरवून उभं होतं. लांबसडक पारंब्या खाली लोंबत होत्या. सभोवार वैशाखातलं वैराण ऊन आणि उन्हाच्या उष्ण लाटा. एवढ्या प्रखर उन्हात देखील वडाच्या झाडाखाली शांत गारवा होता. गावाच्या मध्यभागी झाड असलेल्या घराच्या आसपास वडाच्या या बुंध्यालगतच्या कट्ट्यावर मुलं खेळत होती. मुलांचे अनेक खेळ चालू होते. काहीजण गोट्यांनी खेळत होते, काही काजूच्या बियांनी, काही लपाछपी तर काही सोंगट्यांनी.

त्या मुलांसोबत दोन-तीन मुंबईकर मुलंही होती. पाचवी-सहावीत शिकणारी आणि सुट्टीत कोकणात आलेली. मुंबईकर मुलं खेळात चांगलीच दंग झाली होती. मुंबईतल्या कोंदट वातावरणापेक्षा या झाडाखालची नीरव शांतता त्यांना आवडली होती. त्यात लाल चोची उघडून बघणारी चिमणीची पिल्लं आणि त्या रणरणत्या उन्हात देखील 'कुहूऽऽकुहूऽऽ' कोकिळेचे गोड स्वर.

कोकिळेचे सूर ऐकू येताच सर्व मुलं वर बघू लागली. फांदी, पानाआडून कोकिळेला शोधू लागली. एवढ्यात वाऱ्याची झुळूक आली. वडाची पानं हालली. मंद हसली आणि बोलू लागली, ''ऐकलं का रे बाळांनो, एवढ्या रखरखत्या उन्हात देखील तुम्हाला कसं शांत शांत वाटतंय. माझ्या छायेखाली तुम्ही आनंदानं खेळताय. माझ्या घनदाट सावलीखाली थकले-भागलेले लोक विसावा घेतात. माझ्या सावलीखाली तुमच्यासारखी ती गाई-गुरं पण बसलीत बघा. रवंथ करत विश्रांती घेताहेत. माझ्या फांदीवर किलबिल करणारे कित्ती कित्ती म्हणून पक्षी येतात. माझ्याकडची गोड गोड फळे खातात. आपल्या इतर मित्रांना आमंत्रण देतात, मग पोपट, कोकिळेपासून गरुडापर्यंत सारे पक्षी माझ्याकडे येतात. मला देखील आनंद होतो. माझा गोतावळाच तो.. बरं का बाळांनो...

मुलांनो, आता ही घरटी बघा. तीन घरटी या पक्ष्यांनी माझ्या फांद्यांवर बांधलीत. त्या बाळांचं रक्षण करणं, त्यांना आसरा देणं हे माझं कर्तव्य आहे. त्यांचा सांभाळ करतानाही मला आनंद वाटतो, कारण हे सगळे माझे सोबती आहेत. बरं का बाळांनो, हे काम काही सोप्पं नाहीए. आम्ही झाडं उन्हात उभी असतो. सूर्याची प्रखर उष्णता आम्ही स्वत: सहन करतो आणि तुम्हाला सावली देतो.



बाळांनो, दुसऱ्यांना मदत करायला शिका. आम्ही कसं ऊन–पाऊस सोसतो आणि तुम्हाला सावली, आश्रय देतो. इतकंच काय तुम्हाला गोड गोड फळंही देतो. तसं तुम्ही करा; आणि दुसऱ्यांच्या अडचणींसाठी धावून जा. जीवनातील खराखुरा आनंद या अशा चांगल्या गोष्टीतच भरलेला आहे, हे ध्यानात ठेवा. बरं का बाळांनो....!''

✦

झाडाचा संदेश ऐकून मुलं अवाक झाली. मुंबईकर मुलांना तर मोठाच साक्षात्कार झाला. त्यांना झाडाचं बोलणं पटलं, आवडलं. त्यांनी निश्चय केला. दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचा, दुसऱ्यांसाठी धडपडण्याचा, दुसऱ्यांना आनंद देण्याचा. गावाकडची मुलं होती अनिल, अनंत आणि दिनकर. तर त्यांच्याच गावातल्या घरी चाकरमानी मुंबईहून आलेली मुलं होती संदीप आणि यश. खरंतर ही पाचही मुलं सख्खी–चुलत भावंडं होती. गावातली इतर मुलं आपापल्या घरी खेळायला गेली. अनिल आणि दिनकर यांनी मात्र वेगळीच आयडिया लढवली.

दिनकर म्हणाला, ''अन्या, आपण संदीप आणि यशला घेऊन समोरच्या डोंगरावर जाऊया. तिथं करवंदाच्या जाळी करवंदांनी काळ्याभोर झालेल्या असतील. काळीभोर करवंद म्हणजे...म्हणजे आपल्या कोकणातली 'काळी मैना' आपण आता या काळ्या मैनांचा शोध घेऊ....''

अन्या म्हणाला, ''माझी काहीच हरकत नाही, पण संदीप, यश तिथंपर्यंत चालत येतील का? माळावर काटे असतात. उन्हात उगवलेली 'कोचं' असतात. आपणाला जमेल; पण यांना जमेल का?

संदीप म्हणाला, ''अन्यादादा, आम्ही दोघं येतो. अरे, तुम्ही सोबतीला असताना भीती कसली ? अरे, गावात आल्यावर धूळ–माती लागणारच...जाळीमधली पिकलेली करवंदं..वाऽव...चल जाऊयाच..''

मग अनिल आणि अनंतानं घरच्यांची परवानगी घेतली. ‘सांभाळून न्या रे त्यांना... पाय–बिय सटकेल..यशला हात धरून न्या....संध्याकाळ झालेय. लवकर या....’ आजीनं सूचना केल्यावर पाचही जण मधल्या वाटेने डोंगराच्या दिशेने चालू लागले.

माळरानावरून चालताना, हिरवे अणकुचीदार काटे असणारं हिरवं झुडूप आणि पिवळी फुलं धारण करणारी ती वनस्पती सर्वांचंच लक्ष वेधून घेत होती. तीव्र उन्हात आणि रखरखाटात ही वनस्पती हिरवीगार कशी, अशी शंका संदीपनं विचारलीच.

त्यावर अन्यादादा म्हणाला, ‘‘ही वनस्पती फक्त उन्हातूनच उगवते. भर उन्हानं हिरवे अणकुचीदार काटे लेऊन एकाएकाचा समाचार घ्यायला तयार असते...पण गंमत अशी की, पाऊस सुरू झाला की, या वनस्पतीची मिजास गेली. काटे मलूल होऊन पडतात आणि हिरवळ पिवळी होऊन सुकून जाते....आहे की नाही गंमत !’’

‘‘अरे बापरे ही तर विचित्रच वनस्पती आहे ! आई गं....हा बघ चपलेतून उघड्या पायाला काट्यानं प्रसाद दिलाच...’’ अन्यादादा ताबडतोब मागे आला आणि अणकुचीदार काटा अलगद काढला. ‘कोचं’ चुकवून चालण्याच्या सूचना अन्यादादानं सर्वांना दिल्या. माळरान संपवून सारे डोंगर चढू लागले. इतरत्र पसरलेल्या करवंदीच्या जाळी आणि त्यांना लगडलेले काळेभोर करवंदाचे घोस पाहून मुलं खूश झाली. संदीपनं करवंदाच्या जाळीत हात घातला आणि करवंदं तोडली. पांढऱ्या सफेद चिकाची काळी करवंदं खाताना येणारी मजा सारे अनुभवू लागले. किती काढावीत, खुडावीत आणि कित्ती कित्ती खावीत हेच सुचेना. अन्यादादानं कुंभयाच्या झाडाची पसरट पानं काढली आणि करवंदं जमा करण्यासाठी छानसे टोके करून दिले.

आता संध्याकाळ झाली होती. अंधार पडायच्या आत घर गाठणं आवश्यक होतं. अन्यादादानं सर्वांना घरी परत फिरण्याच्या सूचना केल्या आणि ते पाचही जण डोंगर उतरू लागले. हातात करवंदाचे टोके घेत, करवंदं खात चालत असतानाच, डोंगरउतरणीच्या एका झाडाच्या घळणीतून हंबरण्याचा आवाज येऊ लागला. सायंकाळच्या शांत वातावरणात डोंगर उतरणीतला तो आर्त आवाज ऐकून मुलं सावध झाली. अन्यादादा म्हणाला, ‘‘दिनकर, आपण सारे या आवाजाच्या दिशेनं जाऊ. कोणतरी गाय–बैल घळणीत अडकलेलं दिसतंय...’’

मग पाचहीजण झाडाच्या दिशेनं गेले. ते डोळ्यासमोरचे दृश्य पाहून सारेच अवाक झाले. दोन झाडांच्या बुंध्यात मान घासताना गाईचं तोंड बुंध्यात अडकलं होतं आणि मान सोडवू पाहणार तर मागचे दोन पाय घळणीच्या उतारामुळे खाली खाली सरकत होते. तिच्या ओरडण्यानं आणि धडपडीनं ती अधिकच खाली येत होती आणि मानेच्या भागावर दाब येत होता....ते दृश्य पाहून अन्यादादा पुढे आला. पाचहीजणांना म्हणाला, ‘‘आता वेळ नको.

ताबडतोब आपण जोर करून गाईला वरच्या दिशेनं ढकलायला हवं, नाहीतर थोड्याच वेळात गाय गतप्राण होईल. चला वेळ काढू नका....जोर करून गाईचा मागचा भाग वर करूया.''

संदीप म्हणाला, ''अन्यादादा, कोणाला तरी मोठ्या माणसाला बोलव. आपण एवढी मोठी गाय कशी काय उचलणार?''

अन्यादादा घाईत म्हणाला, ''दिनकर, अनंता, संदीप आता एवढ्या लांबवर बोलवायला केव्हा जाणार...तोपर्यंत तिचा जीव जाईल. अरे, आपण पाचजण, म्हणजे मोठे दोन पुरुष. चला या इकडं. अनंता, त्या झाडाखाली मोठा बांबू दिसतोय. तो पटकन घे. बांबू घळणीत रुतवूया.''

अनंतानं बांबू आणला. जोर करून घळणीतल्या दगडाला लावून आधार घेतला. दिनकरला गाईच्या तोंडाजवळ मान कमी घासेल असं धरायला सांगितलं. बांबूचा दुसरा भाग तिघांना जोर करून उचलायला सांगितला आणि अन्यादादा मागून गाईची शेपटी पकडून वर ढकलू लागला. गाईला मदत मिळताच गाय पाला झटकन जोर करू लागली. गाईनं जोर केल्याबरोबर बांबूचा दाब वाढून या तिघांच्या हातावर दबाव आला; परत त्यांचे हात खाली आले. पुन्हा गाय ओरडू लागली. गाईचं तडफडणं बघवत नव्हतं. अन्यादादा दिनकरवर ओरडला, ''दिनकर, अनंता जोर करा...असेल तेवढी ताकद काढा...मीही जोर करतो...दमून चालणार नाही! चला पुन्हा प्रयत्न करू...पुन्हा जोर करू.''

मग पुन्हा व्यवस्थितपणे बांबू अडकवला. एकदम सर्वांनी जोर लावला. अन्यादादानं सगळी ताकद पणाला लावून गाईची शेपटी घळणीच्या पृष्ठभागावर राहून ओढली. त्या तिघांचा जोर आणि अन्यादादाचं जोर करून ओढणं, यामुळे गाईचा बराचसा भाग पृष्ठभागावर आला. आता सारेजण वर आले. गाईला सरळ करत अलगदपणे तिची मान झाडाच्या बुंध्यातून सोडवली. मान मोकळी झाल्यानं आणि पायांना पृष्ठभागाचा आधार मिळाल्यानं गाय तिथंच उठून उभी राहिली. जोराजोरात श्वास घेत स्वत:ला मोकळं करू लागली. अन्यादादानं तिच्या कानाला, मानेला हात लावून धूळ-कचरा झटकला....अनंता, दिनकर, संदीप आणि यश चौघेही गाईजवळ आले आणि गाईच्या अंगावरील धूळ-माती साफ करू लागले. ते जसजसे गाईच्या सर्वांगाला स्पर्श करत होते, तसे गाईच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. गाईच्या डोळ्यातले ते अश्रू म्हणजे जणू मायेचे कढच होते..!

गाय मग हळूहळू चालू लागली. चालताना चटकन जाणवलं की, तिचा मागचा एक पाय लंगडत होता. पायाच्या सांध्याला बहुधा मार लागलेला असावा. आता सारे परत फिरणार तेवढ्यात घाईघाईत गावातले मधुकाका आले, ''अरे, पोरानु..माझी गाय...सापडली का ? कधीपासून शोधतोय...सगळ्या जाळी धुंडाळल्या...नदीच्या काठानं पाहिलं. आता तर काळोख




होतोय...म्हटलं चुकून डोंगरावर आली की काय ? तुमचा आवाज आला नि आलो. कशी हाय माझी गाय...अरे, बाबांनो गाभण आहे रे ती....!''

मग अन्यादादानं सारं सविस्तरपणे सांगितलं. अडकलेल्या गाईला किती प्रयत्नपूर्वक आणि तातडीने निर्णय घेऊन वाचवलं हे सांगितलं. मधुकाका जाम खूश झाले. मुलांना घेऊन गावात आले. गाईला गोठ्यात बांधलं. मधुकाकाच्या घरातल्या सर्वांनी त्या मुलांचे आभार मानले. काकीनं गरम पाणी केलं. हळद लावून गाईचा कणा शेकवू लागली. गाभण गाय अगदी सुरक्षित होती. ही मुलं नसती तर, गाय गतप्राण झाली असती. मग मधुकाका त्या साऱ्यांना घेऊन अन्यादादाच्या घरी निघाले. म्हणाले, ''बाळांनो, तुम्ही आज दोन जिवांच्या मन गायत्रीला जीवदान दिलंय. तुमचं कौतुक, तुमचं साहस, तुमचा हजरजबाबीपणा घरच्यांना सांगितलाच पाहिजे...''

मुलांचं कौतुक करत मधुकाका संधिप्रकाशातून मुलांसोबत त्यांच्या घरी सुखरूपपणे त्यांना घेऊन जात होते. अन्यादादा, दिनकर, अनंत, संदीप आणि यश यांना एक चांगलं साहस...चांगलं काम केल्याचं समाधान वाटत होतं. दुसऱ्यांसाठी उपयोगी पडण्याचा झाडाचा संदेश त्यांनी खरोखरच आचरणात आणला होता.

✦✦



# राक्षस मित्र

कंटाळा आला त्या परीक्षेचा आणि अभ्यासाचा! जरा खेळायला गेलो, तर बाबा ओरडतात, 'अभ्यास कर, अभ्यास कर....परीक्षा जवळ आली तरी हुंदडायचं कमी होत नाही...' त्या दिवशी बाबा आईवरच रागावले, 'तूच लाडावून ठेवलायस त्याला. तूच लाडोबा केलायस, जरा म्हणून तुझा धाक नाही त्याच्यावर.'

मग आई कसली गप्प बसते....! ती बाबांवर रागवली आणि म्हणू लागली, 'तुमचा किती धाक आहे ? तुम्हाला तरी घाबरतो का? तुम्ही काय नसते लाड थोडे करता ? नको म्हटलं तरी खेळणी आणून देता. बाजारात नवीन वस्तू दिसली की आणली...'

बाबा बिचारे खरोखरच गप्प बसले. आई-बाबांचं भांडण ऐकून मीच मुकाट्यानं अभ्यासाला बसलो; पण खरं सांगू ? या अभ्यासाचं काही खरं नाही. त्यात गणित म्हणजे आमची डोकेदुखी. जरा म्हणून टाळक्यात शिरत नाही. बरं किती किती म्हणून अभ्यास करायचा ? गणितं, समीकरणं, सूत्र, भूमिती एवढी पाठांतरं ! प्रत्येक विषयाचं तेच. बाईंचंपण शाळेत तेच सारखं. अभ्यासक्रम झाला, आता उजळणी प्रश्न सोडवा, व्यवसाय पूर्ण करा, धड्यावरचे प्रश्न, गाळलेले शब्द....'

'खरं सांगू...डोकं गरगरायला लागतं हे सारं ऐकून. खेळायला पण देत नाहीत आणि गप्पापण नाहीत. बाईसुद्धा काय सांगू...म्हणतात कशा, 'तू मॉनिटर आहेस ना ? सर्वांना शिस्त लाव. रांगेत उभं राहायला सांग; जे बोलतील, गडबड करतील त्यांची नाव लिही आणि माझ्याकडे तक्रार कर.'

'आता परवा तो जयेश. ऐकत नाही, म्हणून एक पट्टी लगावली, तर लागला रडायला. मग गेला बाईंकडे माझी तक्रार करत. बाईंनी मग माझीच खरडपट्टी काढली. मोठ्या मोठ्यानं ओरडल्या. म्हणाल्या, 'तुला काय मारायला सांगितलं होतं ? फक्त नावे लिहायला सांगितली... आणि तू मारत सुटतोस ? पकड कान... आणि उभा राहा कोपऱ्यात !'

मित्रांनो, मुकाट्यानं मी शिक्षा भोगली. आता त्याला गप्प करायला गेलो, तर मलाच शिक्षा. काय खरं नाही. घरी आईला सांगितलं तर म्हणते कशी, 'तू मॉनिटरगिरी सोडून दे. फक्त अभ्यास कर. दुनियादारी नको. बस् झाली केलीस तेवढी..!

'आई आमची बोलायला लागली की, बाबा म्हणतात तशी सुसाट मेल. दुसरं कोणी बोलायचंच नाही; पण मित्रांनो, तसं पाहिलं तर आईचं बरोबरच आहे. बाबांचं पण बरोबर, पण मग सारं माझंच चुकतंय का ? आता एवढ्या क्रिकेटच्या मॅचेस सुरू असतात. टीव्हीवर तर 'ट्वेन्टी-ट्वेन्टी' 'आयपीएल' च्या मॅचेस सुरू असतात. सारे जण मग टीव्ही बघतात, अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत...!

सचिनची सुंदर फटकेबाजी बघायला किती मजा वाटते. आपल्या इवल्याशा मनगटात रग येते. वाटतं आपण पण चौकार मारावेत. बॉण्ड्रीच्या बाहेर षट्कार ठोकावेत, मग प्रचंड टाळ्या, आनंदी आनंद...! पण ही माणसं खेळू देतील तर ना...?

परवा 'वन-डे' आणि कसोटी मालिकेत भारतानं विजय मिळवला. सर्वत्र फटाके-धूमधडाका-आतषबाजी. जणू दिवाळीच साजरी झाली. आता अशा वेळी काय पुस्तकात डोकं खुपसून बसायचं का ? आनंद साजरा करायला नको ? थोडा वेळ टीव्ही पाहत बसलो, तर आई-बाबा आलेच.

बाबा म्हणाले, 'बस् झाला आता आनंदोत्सव...! अभ्यासाकडे बघा...!'

बाबांचं झाल्यावर आई म्हणते, 'परीक्षेचा अभ्यास कर. पेपर सोडवायला तुझा सचिन येणार नाहीए...तुलाच परीक्षेला बसावं लागणार आहे...'

आता काय बोलणार बोला ? आनंद पण साजरा करू देत नाहीत ही मंडळी. आणि अभ्यासाचं म्हणाल...तर कुणी काय केलंय? गणित तर आमच्या टाळक्यात येतच नाही...



✦

पण बरं का मित्रांनो, मला एक चांगला मित्र सापडलाय..तोच माझ्या मदतीला धावून येतो. खरं सांगायचं म्हणजे माझी म्हणून जी बाजू आहे किंवा मला जे म्हणायचं असतं, ते तोच ओळखतो. मला समजून घेतो...,या मित्राचं नाव ऐकून तुम्ही नक्कीच

घाबराल...निदान दचकालच...! माझा हा नवीन मित्र म्हणजे राक्षस आहे राक्षस..! त्यानंच मला त्याचं नाव 'जिंदा' असं सांगितलं. जिंदाची नि माझी दोस्ती आहे. आता राक्षस म्हटलं की, तुम्ही घाबरणार; पण घाबरू नका. हा राक्षस, म्हणजे 'जिंदा' अगदी प्रेमळ आहे. मी तर त्याला 'प्रेमळ जिंदा' मानतो. राक्षस म्हटलं की, तो दुष्ट, देव-दानव युद्ध करणारा, अजब रसायन असणारा धष्टपुष्ट...! हा पण धष्टपुष्ट आहे; पण माझ्या मदतीला धावणारा आहे...आता तुम्ही म्हणाल, तू मनुष्य जातीचा आणि राक्षस तुझा मित्र कसा ? तुला प्रत्यक्षात भेटतो कसा? तुला मदत करतो कसा? तुझ्या सोबत असतो का ? मित्रांनो, अनेक प्रश्न तुमच्या डोक्यात असतील...सांगतो तुम्हाला, पण हे 'सिक्रेट' कोणाला सांगू नका हं...!

त्याचं काय झालं. आई-बाबा मला अभ्यास करायला सारखे सांगत. शाळेत बाई ओरडत. जयेशला मारलं म्हणून 'मॉनिटरगिरी' गेली. माझ्यावर सगळ्यांचाच राग. बरं गणिताचे सर म्हणजे कर्दनकाळ. कधी कुणाचं ऐकायचं नाही. नुसता त्रागा आणि आरडाओरडा. आता मला गणितातली सूत्रं येत नाहीत. पाठांतर करून लक्षात राहत नाहीत, त्याला मी काय करू ? एक-दोन वेळा जोर करून गणितच्या साठे सरांना काही शंका विचारल्या, तर उलट मलाच दम. म्हणाले, 'शहाणा समजतोस काय स्वत:ला ? पुढे पुढे बोलता येतं, नको ते प्रश्न विचारता येतात...पण गणित टाळक्यात शिरत नाही. पाठांतर नाही. घोकमपट्टी करायला नको, आई-वडील कष्ट करतात....थोडं मनावर घ्या...!'

साठे सरांचं टोचून बोलणं मला अजिबात आवडत नव्हतं. मित्रांनो, खरं सांगतो, या साठे सरांची आणि माझी दुश्मनी सुरू झाली. मी गणितं सोडवत नाही म्हणून आई-वडिलांकडे तक्रार गेली. एकदा वडील भेटून गेले. आमचे बाबा म्हणजे अगदी साधे-भोळे. माझ्यावर त्यांचा जीव की प्राण. जरा दुखलं-खुपलं, शिंक आली तर काळजी करणार. जवळ बसून सेवा करणार. आजारपणात रात्ररात्र जागे राहणार आणि सकाळी उठून कामावर जाणार, तर बाबा शाळेत गेले. साठे सरांना भेटले. त्यांना समजावून परत आले. मित्रांनो, तुम्हाला सांगितलं ना माझे बाबा एकदम भोळे. तसंच झालं. त्यांनी तो 'तारे जमीन पर' पिक्चर पाहिलेला. अर्थात आम्ही सर्वांनी पाहिलेला. बाबांना तो पिक्चर खूप आवडलेला. अगदी भावनावश होऊन डोळ्यातून पाणी झिरपायचं. पिक्चर बघतानाही मला चाचपत असत. तर काय सांगतो. मित्रांनो, त्या दिवशी बाबा शाळेतून घरी आले आणि माझ्याकडं दयेनं पाहू लागले. मला जराही ओरडले नाहीत. त्यांचा शंभर टक्के ग्रह झाला की, मी 'तारे जमीन पर' मधला 'इशान अवस्थी' आहे. इशानसारखा मला त्रास असावा, यासाठी ते आईकडे चर्चा करू लागले. डॉक्टरना विचारावं इथंपर्यंत गोष्ट गेली, मग मात्र बाबांना मी सांगितलं, 'बाबा, तुम्ही घाबरू नका. मी इशान नाहीए. मला इतर सर्व विषय समजतात. अक्षरं, चित्रं, उलटं-सुलटं सगळं अगदी नीट नीट समजतं. फक्त गणित टाळक्यात